क्र. जमीन १०/२००६/ प्र.क्र. ८६/ज-१
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- २० ऑक्टोबर, २००६

प्रति,

सर्व विभागीय आयुक्त.
सर्व जिल्हाधिकारी.

विषय : शासकीय जमिनीचा आगाऊ ताबा देण्याबाबत.

महोदय,

शासन निर्णय क्रमांक जमीन १०/२००५/प्र.क्र.३८/ज-१, दि.७.३.२००६ अन्वये शासकीय जमिनीचा आगाऊ ताबा देण्याबाबतचे आदेश पारित्त करण्यात आले आहेत. सदर शासन निर्णयातील परिच्छेद २ (३) मध्ये निर्बाधरित्या वाटपास उपलब्ध असलेल्या शासकीय जमिनीचा आगाऊ ताबा राज्य / केंद्र शासनाच्या विविध विभागांना / उपक्रमांना देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात आले आहेत. त्या अनुषंगाने आपणांस असे कळविण्यात येते की, सामाजिक न्याय विभाग हा शासनाच्या अखत्यारितील एक विभाग असल्याने व सदर विभागामार्फत लोकोपयोगी योजनांची अंमलबजावणी करण्यात येत असल्याने, सामाजिक न्याय विभागाकडून त्यांच्या विविध योजनांकरीता आवश्यकतेनुसार संबंधित विभागाने ठरविलेले निकष, मंजूर टाईप प्लॅन व जागेची खरीखुरी आवश्यता (Bons-fide area requirement) विचारात घेऊन शासकीय जमिनींची मागणी करण्यात आल्यास सदर जमीन निर्बाधरित्या वाटपास उपलब्ध असल्यास जिल्हाधिकारी यांनी शासन निर्णय क्र.जमीन १०/२००५/प्र.क्र. ३८/ज-१, दि.७.३.२००६ मधील तरतुदीस अनुलक्षून आवश्यक त्या अटी व शर्तीवर जमिनीचा आगाऊ ताबा देण्याची कार्यवाही करावी आणि वित्तिय मर्यादेच्या अधीन राहून आवश्यकतेनुसार शासनाच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करावा.

आपला

प्रजमुळे

( प्र.ज. मुळे )
कार्यासन अधिकारी
महसूल व वन विभाग

५३०३९ 8 NOV 2006